# राष्ट्रीय पंचायत पुरस्कार

संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केलेली 17 शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) साध्य करण्यासाठी केंद्र सरकारच्या पंचायतीराज मंत्रालयाने देशातील ग्रामपंचायतींसाठी नऊ विकास संकल्पना जाहीर केल्या आहेत. त्या खालील प्रमाणः-

1) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव (Poverty free and enhanced livelihoods Village)
2)आरोग्यदायी गाव (Healthy Village)
3) बालस्नेही गाव (Child-friendly Village)
4) जल समृद्ध गाव (water sufficient Village)
5) स्वछ आणि हरित गाव (Clean and Green Village)
6) पायाभूत सुविधा युक्त स्वयंपूर्ण गाव (Self-sufficient infrastructure in Village)
7) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव (Socially Secured Village)
8) सुशासन युक्त गाव (Village with Good Governance)
9) लिंग समभाव पोषक गाव (Engendered Development in Village)

ग्राम विकास विभागामार्फत या संकल्पनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या संकल्पनांमध्ये उत्तम काम करणा-या ग्रामपंचायतींसाठी 2023 पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांची योजना सुरू केली आहे. राज्यातील 27891 ग्रामपंचायतींपैकी 27293 ग्रामपंचायतींनी (97.85 %) यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये भाग घेतला होता. नऊ संकल्पना व विशेष पुरस्कार या श्रेणींमध्ये पुरस्कार जाहीर करण्यात आले. दि. 17 एप्रिल, 2023 रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे देशाच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या शुभहस्ते व केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्री मा.श्री. गिरीराज सिंह व इतर मंत्री महोदयांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातील खालील ग्रामपंचायती पुरस्कार प्राप्त ठरल्या.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | पुरस्कार श्रेणी | क्रमांक | बक्षिस रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | ग्रामपंचायत खडोबाची वाडी, ता. पलूस, जिल्हा- सांगली | गरिबीमुक्त गाव | प्रथम | रू. 1 कोटी |
| 2. | ग्रामपंचायत कुंडल, ता. पलूस, जिल्हा- सांगली | स्वच्छ व हरित ग्राम | प्रथम | रू. 1 कोटी |
| 3. | ग्रामपंचायत अलाबाद, ता. कागल, जिल्हा- कोल्हापूर | महिला स्नेही गाव | तृतीय | रू. 50 लक्ष |

| विशेष पुरस्कार | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | ग्रामपंचाय ठिकेकरवाडी, ता. जुन्नर,जिल्हा- पुणे | ग्राम उर्जा स्वराज पुरस्कार | प्रथम | रू. 1 कोटी |
| 5. | ग्रामपंचायत पाटोदा, ता.जि. औरंगाबाद | कार्बन न्युट्रल गाव | द्वितीय | रू. 75 लक्ष |

**या व्यतिरिक्त दिनांक-** 21/4/2023 **रोजी मा. श्री. नरेंद्र मोदी , पंतप्रधान, भारत सरकार यांच्या शुभहस्ते आरोग्य सेवांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल लातूर जिल्हयाला प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले**.